# मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय,
# मुंबई - 400 012

## दुग्धजन्य पदार्थप्रक्रिया प्रशिक्षणाचे आयोजन

मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, येथे दि. ५ ते ७ जुन, २०१८ रोजी 'दुग्धजन्यपदार्थ प्रक्रिया प्रशिक्षण' आयोजित करण्यात आले आहे. उत्तम प्रतीचे दूध व दुग्धजन्य पदार्थांची वाढती मागणी लक्षात घेवून दूध उत्पादक तसेच बेरोजगार युवकांसाठी दुग्धजन्य पदार्थांचा स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी सदर प्रशिक्षण उपयोगी ठरणार आहे. या प्रशिक्षणामध्ये दुधापासून बनणारे सुगंधी दूध, बासुंदी, खवा, पनीर, दही, लस्सी, श्रीखंड, क्रीम इ. पदार्थ विविध यंत्रांच्या सहाय्याने तयार करणे, दूध संकलन व वितरण तसेच दूध व दुग्धपदार्थांची गुणवत्ता तपासणी याविषयी प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

प्रवेश क्षमता: ३० प्रशिक्षणार्थी फक्त

प्रशिक्षण शुल्क: रु. १५००=०० प्रती व्यक्ती. याशिवाय, निवास व भोजन खर्च प्रशिक्षणार्थींनी स्वतः करावयाचा आहे.

तरी, इच्छुकांनी नाव नोंदणीसाठी डॉ. शेखर र. बढे (८०००३५३४३२) व डॉ. विवेक शुक्ला (८७७९६१२२७३) यांच्याशी संपर्क साधावा.